महाराष्ट्र शासन
सुधारणा व पुनर्वसन
Tel.No. : (020) 26124815
Fax No.: (020) 26125878
अपर पोलीस महासंचालनालय व महानिरीक्षनालय,
कारागृह व सुधारसेवा, महाराष्ट्र राज्य,
जुनी मध्यवर्ती इमारत,२ रा मजला,
पुणे ४११ ००१

**परिपत्रक**

जा.क्र.इप्रवि/उपहारगृह/बंदी खर्च मर्यादा/ १०५१४ /२०२३ कक्ष ४(२) पुणे - १, दिनांक २५.१०.२०२३

**विषय - कारागृहातील बंद्यांना त्यांचे खाजगी पैसे व कामाच्या मोबदल्यात मिळणारा मेहनताना याव्दारे जमा असलेल्या रक्कमेतून एकूण खर्चाच्या रकमेची मर्यादा वाढविणेबाबत.**

संदर्भ:- मुख्यालयाकडील परिपत्रक क्र.५०१२/२०२३, दिनांक ०८.०७.२०२२

उपरोक्त विषयान्वये संदर्भीय परिपत्रकानुसार कारागृहातील बंद्यांना त्यांचे खाजगी पैसे व कामाच्या मोबदल्यात मिळणारा मेहनताना याव्दारे त्यांच्या नावे जमा असलेल्या रक्कमेतून उपहारगृहामधून दैनंदीन गरजेच्या वस्तु/साहित्य/खाद्यपदार्थ खरेदीकरीता एकूण खर्चाच्या रक्कमेतील मर्यादेत वेळोवेळी वाढ करण्यात आलेली आहे.

वाढती महागाई दर, वस्तूंचे / खाद्य पदार्थांचे वाढलेले दर, नविन वस्तुकर प्रणाली यामुळे उक्त खर्च मर्यादेत रु.८०००/- पर्यत वाढ करणेबाबत बंद्याची विनंती असल्याबाबत अधीक्षक नागपूर मध्यवर्ती कारागृह यांनी प्रादेशिक विभाग प्रमुख व अधीक्षक, मध्यवर्ती कारागृह यांचे दिनांक १०.१०.२०२३ रोजीचे बैठकीत निदर्शनास आणून दिले होते.

उक्तनुसार सध्या उपहारगृहातून खरेदीसाठी बंदयांना मासिक रु.६०००/- इतकी खर्चाची मर्यादा आहे. ती मर्यादा आता रु.८०००/- इतकी प्रतिमाह मागविणेची मर्यादा वाढविण्यात आली व प्रतिमाह रु.१०,०००/- इतकी रक्कम खर्च करण्याची परवानगी दि.०१.११.२०२३ पासून करण्यात आली आहे. तरी उक्त निर्देशाप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी.

(अमिताभ गुप्ता)
अपर पोलीस महासंचालक व
महानिरीक्षक कारागृह व सुधारसेवा
महाराष्ट्र राज्य, पुणे-१

प्रति,

अधीक्षक - मध्यवर्ती/ जिल्हा/खुले/विशेष कारागृह (सर्व), प्राचार्य किशोर सुधारालय, नाशिक
संपर्क अधिकारी, खुली वसाहत, आटपाडी,जि सांगली

**प्रत : माहिती व पुढील कार्यवाहीस्तव**

विशेष पोलीस महानिरीक्षक (का.), पुर्व विभाग, नागपूर, कारागृह उपमहानिरीक्षक (सर्व)